# मुलांतील सुप्त गुण ओळखूनच त्यांना मार्ग दाखवा

## प्राचार्य श्रीक्रिष्णा नाईक | घोटेली नं -२ सरकारी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन





केरी : सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना मुले. दुसऱ्या छायाचित्राच बोलताना प्राचार्य श्रीक्रिष्णा नाईक. बाजूला इतर.

टीम दैनिक हेराल्ड

**केरी- सत्तरी, दि. १६** : पालकांना आपल्या मुलांतील सुप्त गुण ओळखून त्यांची कुवत जाणून घेऊनच त्यांना पुढील मार्ग दाखवावा. त्यानंतर त्यांना पुढे कसे घडवावे ते आपले शिक्षक बघणार, उगाच आपल्या मुलांच्या डोक्यावर अभ्यासाचा ताण देऊ नये, त्यांच्या कुवतीनुसार त्यांना शिकवावे, असे सरकारी उच्च माध्यमिक साखळीचे प्राचार्य श्रीक्रिष्णा नाईक यांनी सांगितले.

सरकारी प्राथमिक विद्यालय घोटेली नं -२ केरी सत्तरीचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम शाळेच्या पाटांगणात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य नाईक बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख वक्ते म्हणून आरोग्य खात्याचे अधिकारी गौरीश गांजेकर, अध्यक्ष म्हणून सरपंच सुप्रिया गावस, खास निमंत्रित पंच राजेश गावस, माजी विद्यार्थी संघटनेचे बाबली गावस, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा निशा गावस, कार्यकारी मुख्याध्यापिका आस्था नाईक, ज्येष्ठ नागरिक व माजी विद्यार्थी सीताराम गावस उपस्थित होते.

डॉ. गांजेकर यांनी सांगितले की, मुलांमधील आवड शोधून काढा, जेव्हा त्यांना दुसऱ्या गोष्टीची आवड लागेल तेव्हाच मुले मोबाईलपासून दूर राहतील. आपली प्रतिमा ही आपणच घडवू शकतात आणि जर प्रतिमा घडवायची असेल तर वाचन महत्वाचे आहे. वाचन केले तरच आपल्याला आपला इतिहास कळेल आणि तेव्हाच विद्यार्थी इतिहास घडवू शकतो.

शिक्षिका सुवर्णा गावस हिने कार्यक्रमाचे स्वागत केले. प्रास्ताविक कार्यकारी मुख्याध्यापिका आस्था नाईक हिने केले. पाहुण्यांची ओळख शिक्षिका सुवर्णा गावस हिने केली. अहवाल वाचन आस्था नाईक, बक्षीस वितरणचे सूत्रसंचालन अर्चना माजिक व अनुराधा गावस यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा गावस हिने केले तर आभार अर्चना माजिक यांनी मानले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा गावस व अनुराधा गावस यांनी केले.

पान १ वरून

### पर्यावरण रक्षणावर आसगाव ग्रामसभेत गंभीर चर्चा

२०१९ पासून ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण झाले नसल्याच्या मुद्द्यावरही ग्रामसभेत चिंता व्यक्त करण्यात आली. ग्रामस्थांनी याबाबत त्वरित माहिती मिळावी, अशी मागणी केली. या ग्रामसभेत पर्यावरण संरक्षण, बांधकाम नियमांचे उल्लंघन, विकासकामांतील दिरंगाई आणि सरकारी विभागांची उदासीनता यासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. ग्रामस्थांनी हिरवाईच्या रक्षणासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले असून, यासंदर्भात पुढील ग्रामसभेत अधिक स्पष्ट धोरण ठरवले जाईल.

# बांद्यात जंगली श्वापदाकडून वासराचा फडशा

टीम दैनिक हेराल्ड

**बांदा दि.१६** : सावंतवाडी तालुक्यातील बांदा शहरात उभा बाजार येथे भर वस्तीत घरामागे असलेल्या गोठ्यात शिरून एका जंगली श्वापदाने गोठ्यात बांधलेल्या वासराचा फडशा पाडण्याची धक्कादायक घटना आज घडली. बांदा उभाबाजार येथील राजेश पावसकर हे गेली कित्येक वर्षे गोपालन करतात. त्यांच्या गोठ्यात गाय आणि वासरू बांधलेले होते. आज सकाळी ते गोठ्यात गेले असता रक्तबंबाळ वासरू मृता वस्तीत पाहून त्यांना धक्काच बसला. गोठ्यात रक्ताचा सडा पसरला होता आणि वासराचे जागोजागी लचके तोडण्यात आले होते .घटनेची खबर मिळतात बांदा सरपंच प्रियांका नाईक,बांदा परिमंडळ वन अधिकारी प्रमोद सावंत, वनरक्षक वैभव हितापे,पोलीस पाटील राजन गवस , सामाजिक कार्यकर्ते शैलेश केसरकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला. वासराचे लचके तोडलेले आहेत त्यावरून हेच श्वापद वाघाटी किंवा बिबटा असू शकते. इतक्या वर्षात बांदा शहरात नागरी वस्ती भागात प्रथमच अशी घटना घडली आहे .त्यामुळे लोकवस्ती असलेल्या भागात जंगली श्वापदाच्या वावरामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दाबेल येथील नवीन शेड बांधण्यासाठी जागा निश्चित



पैगीण : दाबेल येथील नवीन गटार व शेड बांधण्याच्या जागेची पाहणी करताना सरपंच सविता तवडकर, पंचसदस्य आनंदू देसाई, अभियंता भीवा वेळीप, आलोख मोडक व अन्य.

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि.१६** : दाबेल, पैंगीण येथे सभापती डॉ.रमेश तवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सरपंच सविता तवडकर यांच्या नेतृत्वाखाली पैगिंण पंचायतीचे अभियंते भीवा वेळीप यांनी दाबेल येथील नवीन गटार व शेड बांधण्यासाठी जागेची पाहणी करण्यात आली. या खोतिगाव पंचायतीचे माजी सरपंच आणि पंचसदस्य आनंदू देसाई आणि स्थानिक आलोख मोडक उपस्थित होते.

पावसाळ्यात दाबेल येथे रस्त्यावर पाणीच पाणी असते. याविषयीची माहिती सरपंच तवडकर यांना दिली. त्याचबरोबर दाबेल येथील गणपती विसर्जन, आमोणे येथील गणपती विसर्जन त्याचबरोबर सार्वजनिक कृष्णमूर्ती विसर्जनावेळी नदीकाठी अनेक समस्या जाणवतात, त्याचे निर्वहन करण्याची मागणी सरपंच तवडकर यांना करण्यात आली होती. या मागणीच्या अनुषंगाने जागेचे निरीक्षण करण्यात आले. लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लागेल असे सरपंच सौ. तवडकर यांनी सांगितले.

# गोवा आयडीसीचा गव्हर्नन्स नाऊ वेस्ट टेक अवॉर्ड्समध्ये सन्मान

## आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स यांना सीएमडी लीडरशिप पुरस्कार

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६** : गोवा औद्योगिक विकास महामंडळ (गोवा-आयडीसी) ला प्रतिष्ठित गव्हर्नन्स नाऊ वेस्ट टेक सिम्पोझियम आणि अवॉर्ड्स २०२५' मध्ये सन्मानित करण्यात आले. गोवा-आयडीसीचे चेअरमन आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स यांना प्रतिष्ठित सीएमडी लीडरशिप अवॉर्ड प्रदान करण्यात आला. अनुकरणीय नेतृत्व आणि गोवा-आयडीसीमधील प्रशासन आणि तांत्रिक सुधारणांमध्ये महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

चेअरमन लॉरेन्स यांच्या नेतृत्वाखाली, गोवा-आयडीसीने प्रगतशील औद्योगिक धोरण, व्यवसायसुलभतेसाठी विविध मान्यता प्रक्रियांचे सुलभीकरण करणे आणि शाश्वत औद्योगिक विकासासाठी अनुकूल वातावरण निर्मिती केली आहे. औद्योगिक क्षेत्रातील प्रशासनात नवोपक्रम, कार्यक्षमता विकास आणि उत्कृष्टतेसाठी महामंडळाच्या समर्पण या बाबींवर या पुरस्काराच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकला गेला आहे.

चेअरमन रेजिनाल्ड लॉरेन्स म्हणाले की, गोवा-आयडीसीने कमी वेळात कर्जमुक्त महामंडळ बनून एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. या यशामुळे आम्हाला गोव्यातील विविध औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासात १०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यास सक्षम केले आहे, ज्यामुळे एक मजबूत आणि व्यवसाय-अनुकूल परिसंस्था सुनिश्चित होणार आहे. शिवाय, महामंडळाने सादर केलेले ओपन पोर्टल हे अशा प्रकारातील पहिले डिजिटल सार्वजनिक सेवाउत्पादन म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. या पोर्टलमुळे राज्याच्या औद्योगिक क्षेत्रात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि व्यवसाय करण्याची सुलभता वाढवून




उद्योग प्रशासनात क्रांती होणार आहे. औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी, गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि गोव्याच्या आर्थिक परिदृश्याला बळकटी देण्यासाठी आमची वचनबद्धता कायम आहे. गेल्या दोन वर्षांत गोवा राज्यात औद्योगिक विकास आणि प्रशासनसुलभतेबाबत गोवा-आयडीसीने राबवलेल्या अनेक परिवर्तनकारी उपक्रमांची माहिती सादर केली. नवीन गोवा औद्योगिक विकास महामंडळ (वाटप, हस्तांतरण आणि उप-भाडेपट्टा) नियम २०२३' हे धोरण लागू केल्याने अनेक प्रक्रिया सुलभ झाल्या आहेत, विलंब कमी झाला आहे आणि पारदर्शकता वाढली आहे, ज्यामुळे गोवा अधिक व्यवसाय-अनुकूल राज्य बनले आहे. आयडीसी कनेक्ट उपक्रमामध्ये २६ कार्यक्रमांच्या माध्यमातून थेट उद्योजक, व्यावसायिकांशी संवाद घडवून आणले, असे चेअरमन रेजिनाल्ड म्हणाले.

**CHANGE IN NAME**

I **FIONA RODRIGUES** Resident of H.No. 161/1 Ferrao Manor, Kaziwada, Ponda Goa has changed my name from **FIONA ALEX RODRIQUES** to **FIONA RODRIGUES**. Hereafter in all my dealings and documents I will be known by new name of as **FIONA RODRIGUES**.

### आरोसबाग पूलावर दारु जप्त

टीम दैनिक हेराल्ड

**बांदा दि. १६**: तेरेखोल नदीवरील आरोसबाग पूलावर गोवा बनावटीच्या बेकायदा दारू वाहतुकीविरोधात इन्सुली राज्य उत्पादन शुल्क विभागाने रविवारी पहाटे कारवाई केली. या कारवाईत १ लाख १४ हजार २४० रुपयांची दारू व ३ लाख रुपयांची कार असा एकूण ४ लाख १४ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बेकायदा दारू वाहतूक प्रकरणी गणेश लक्ष्मण चव्हाण (३५) व सीसील जॉन फेराव (५५, दोघेही रा. सबनीसवाडा, सावंतवाडी) यांना ताब्यात घेण्यात आले. रविवारी पहाटेच्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क इन्सुली पथकाला मिळालेल्या माहितीनुसार तेरेखोल नदिवरील आरोसबाग पुलावर वाहनाची तपासणी सुरु होती. कारच्या मागील हौद्यात गोवा बनावटी दारूच्या विविध बँडचे २४ बॉक्स (११०४ बाटल्या) जप्त करण्यात आल्या.

# आठ दिवसांत करणार घराची दुरुस्ती

टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १६** : आग लागून नुकसान झालेल्या घराची आठ दिवसात दुरुस्ती केले जाणार असल्याचे आश्वासन मार्ना शिवोली पंचायत मंडळांनी दिले. दांडा-शिवोली परिसरातील गीता शिरोडकर यांच्या घराला सकाळी आग लागली होती. या आगीत घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याबाबत माहिती मिळताच पंचायत मंडळाने त्वरित त्या ठिकाणी धाव घेतली. सरपंच संदेश हडफडकर, स्थानिक पंचसदस्य व माजी सरपंच अभय शिरोडकर, माजी उपसरपंच विघ्नेश चोडणकर यांनी घराची पाहणी केली व पूर्ण घराची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत माहिती देताना सरपंच म्हणाले, शिरोडकर यांच्या घराची मोठ्या प्रमाणात नुकसानी झाली आहे. घराची पूर्णपणे दुरुस्ती करण्याचा निर्णय पंचायत मंडळांनी घेतलेला आहे. दुरुस्तीचे काम त्वरित चालू करण्यात आले आहे. आठ दिवसाच्या आत संपूर्ण घराचे दुरुस्ती केली जाणार असल्याचे सरपंचांनी स्पष्ट केले. दरम्यान आमदार दिलायला लोबो यांनीही घराला भेट देऊन पाहणी केली. घरमालकाला सर्वतोपरी मदत




करण्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

# बैलाच्या झुंजीचे आयोजनप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा नोंद

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १६** : मांद्रे पंचायत क्षेत्रात बेकायदेशीर १६ रोजी धिरयो आयोजित केल्याप्रकरणी मांद्रे पोलिसांनी आरिफ मुल्ला व ऋग्वेद नाईक यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आला.

पेडणे तालुक्यातील हरमल मांद्रे कोरगाव या भागात अधून-मधून छुप्या मार्गाने बेकायदेशीर मुक्या प्राण्यांची स्पर्धा आयोजित केली जाते. त्यासाठी लाखो रुपयांच्या पैसाही लावल्या जातात. रविवारी मांद्रे ते पहाटे अशीच एक बैलांची झुंज आयोजित केली होती, या स्पर्धेमध्ये एका बैल मालकाने ही स्पर्धा जिंकल्यामुळे त्यांना १८ लाख रुपयांची पैज विजेता ठरला याची माहिती उशिरा पोलिसांना कळताच मांद्रे पोलिसांनी या घटनेसंदर्भात गुन्हा नोंदवत असताना ऋग्वेद नाईक आणि आरिफ मुल्ला या दोघिंवरोधात गुन्हा नोंदवून मांद्रे पोलीस पुढील तपास करीत आहे. मागच्या पंधरा दिवसापूर्वी अशीच एक बैलांची झुंज हरमल मांन्द्रे परिसरात आयोजित केली होती. परंतु त्या विरोधात कोणीही तक्रार न केल्यामुळे कुणावर गुन्हा नोंदवला गेला नाही. मात्र त्यासंबंधीचा व्हिडिओ सर्वत्र सामाजिक माध्यमातून प्रसारित होत होता.

SUBSTITUTE SERVICE UNDER ORDER 5 RULE 20(1A) OF C.P.C
**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE JUNIOR DIVISION, 'C' COURT, AT PONDA-GOA.**
Reg. Civil Suit No. 67/2022/C
CNR. No. GANG0-8001168-2022
Shri. Suhas Prabhakar Naik. ...Plaintiff
V/s
Shri. Shayid Shafi Kazi. ...Defendant
**NOTICE**
To
Defendant
Mr. Shayid Shafi Kazi, Age 26 years, Business, Proprietor of M/s. Hurricane Minerals and Logistice, Amina Manzil, Above Marcel Urban Co-operative Credit Society Ltd., Opposite to A.J. Medical Store, Bazar Moll, Ponda - Goa 403401
AND WHEREAS, the above named Plaintiff have instituted a Suit for Recovery of Money under order XXXVII, Rule 2 of Civil Procedure Code (Copy of plaint and documents may be collected from the office of this Court on any working day during the working hours).
AND WHEREAS the notice issued to you on the above mentioned address have been returned unserved.
AND WHEREAS, the Advocate for the Plaintiff has filed an application before this Court for issue of notice for service by way of Publication, in local daily newspaper.
AND WHEREAS, this Court is satisfied that this is a fit case for ordering service by publication.
NOW, THEREFORE, you are hereby summoned to appear before this Court on **25th day of March, 2025 at 10.00 a.m.** in person or by a pleader duly instructed to answer all material questions related to this claim.
Take note that in default of your appearance on the day mentioned, the suit will be heard and determined in your absence.
Given under my hand and the seal of the Court, this 7th day of February, 2025. SEAL
Sd/- (**Queency D'Silva**)
Civil Judge Junior Division, 'B' Court, Ponda - Goa. I/c Civil Judge Junior Division, 'C' Court, Ponda - Goa.

VILLAGE PANCHAYAT LOLIEM - POLEM, CANACONA - GOA.
Ref: No. VP/LP/CAN/e-tender/Notice/ 2024-25/1350 Date: 10/02/2025
**TENDER NOTICE**
**(E-Tendering Mode only)**
Tender Notice No. VP/LP/CAN/e-tender/Notice/2024-25/1350 in that 1350/1 to 1350/29, dated 10/02/2025, has been issued and the same is displayed on the website.
**https://eprocure.goa.gov.in**
For participation of the interested Contractors in this e-tender, please visit the above mentioned website or contact this office for more details.
Sd/- Sarpanch,
Village Panchayat Loliem-Polem
Canacona-Goa Seal

# वेशभूषा स्पर्धेत विहान, श्रीशा, साईक्रिश प्रथम

टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १६** : कवळे येथील श्री सरस्वती पूर्व प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली वेशभूषा स्पर्धा विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : शिशुवर्ग : प्रथम : विहान विठ्ठल नाईक, द्वितीय : चिदाक्षा समीर नाईक, तृतीय : साई सप्रेश मुळवी, उत्तेजनार्थ : भार्गव सचिन नाईक व देवयांश पुष्पन गावडे. बालवर्ग १ : प्रथम : श्रीशा योगेश पांडे, द्वितीय : प्रियांश विनोद सतरकर ,तृतीय- धनिशा विनायक गावडे,उत्तेजनार्थ - क्रिषा रंगनाथ गावडे.

बालवर्ग २ : प्रथम : साईक्रिश प्रथमेश नाईक, द्वितीय : सार्थक सतीश गावणेकर, तृतीय : प्रज्वती प्रकाश ढेपी व विहान विशांत कवळेकर, उत्तेजनार्थ : श्रीयांश गजानन सावंत, श्रेया युगेश नाईक व अदिती नरेश नाईक. स्पर्धेचे परीक्षण माधवी कपिलेश्वरकर व कविता नाईक यांनी केले. सूत्रनिवेदन व आभार प्रदर्शन गीतेश वेरेकर यांनी केले.



### कुळकार देवाचा आजपासून वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १६** : चोनसाई पार्से येथील श्री देव कूळकार वेताळाचा १३ वा वर्धापनदिन दि. १७ रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी धार्मिक विधी, आरती, तीर्थप्रसाद व दुपारी महाप्रसाद होईल. रात्री ८.३० वाजता श्रींची भव्य पालखी मिरवणूक, तदनंतर रात्री १० वाजता श्री कूळकार वेताळ प्रासादिक नाट्य मंडळातर्फे गणेश हिर्लेकर लिखित व राजेश पाळणी दिग्दर्शित देव्हारा नाटक सादर करण्यात येईल.